स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

प्रधानमंत्री आवास योजना : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

(2017-2018 ते 2022-2023)

संशोधक

कु. कांचन माधव गिरी

एम.ए. (अर्थशास्त्र) बी.एड.

मार्गदर्शक

डॉ. स्मिता उमाकांतराव कोंडेवार

सहा.प्राध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक

कै. वसंतराव काळे वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड -431601

2023

गोषवारा (Abstract) :

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधसाठी संशोधकांने प्रधानमंत्री आवास योजना एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2017-2018 ते 2022-2023) हा विषय निवडला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधक प्रधानमंत्री आवास योजनेचे राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील महत्व समजुन घेवुन नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या मुल्यमापनाचे विश्लेषण करणार आहोत. यामध्ये संशोधकांने नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेचे तालुकानिहाय तसेच वर्षेनिहाय आध्ययन करण्याचे निश्चित केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेव्दारे मिळणाऱ्या लाभांचे आणि समस्यांचे अध्ययन करुन त्यावर उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत. सदरील संशोधनात संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक तसेच व्दितीयक आधार सामग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक आधार सामग्रीसाठी प्रश्नावली तसेच अनुसुची तयार करुन मुलाखती घेण्यात येणार असुन,यासाठी यादृच्छिक नमुना पध्दतींचा अवलंब करुन नमुन्यांची निवड करण्यात येणार आहे.

संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. अशा प्रकारे उपरोक्त संशोधन पध्दतींचा अवलंब करुन, नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात विश्लेषण करण्यात येणार आहे.

1) **प्रस्तावना** (Introduction) :

सामाजिक कल्याणासाठी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत तसेच युरोप खंडापासून ते आशियास खंडापर्यंत अनेक महामानवाने अथक प्रयत्न केले आहेत. ज्या मध्ये त्यांनी वैयक्तिक हितापेक्षा पुढे जाऊन सामाजिक हित साध्य करण्याच्या दृष्टिकोणातुन समाज कल्याण ही संकल्पना अप्रत्यक्षपणे निदर्शनास आणली.

नंतरच्या काळात ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स, पिगू, इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी त्यांच्या विचारातून सामाजिक कल्याणाच्या संदर्भात अनेक विवेचन केल्याचे आपल्याला पहावयास मिळते. भारताच्या संदर्भामध्ये सामाजिक कल्याणाच्या अध्ययनातुन आपणास असे लक्षात येते की, अगदी प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत अनेक राजानी आपला राज्यकारभार समाजास महत्व देवुन समाज हिताच्या दृष्टीकानातून केला जात असत. तर आधुनिक काळातील अर्थतज्ञ जगदिश भगवती, अमर्त्य सेन, अभिजित बॅनर्जी, इत्यादीनी सामाजिक कल्याणाचे महत्व विषद केले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने नियोजनाच्या माध्यमातुन आर्थिक विकास साध्य करण्याचा मार्ग अनुसरला असुन, सुध्दा आज देखील लोकांना विविध सामाजिक व आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. देशातील संसाधनांचा योग्य वापर करुन सामान्य माणसाच्या मुलभुत गरजा पुर्ण करण्यासाठी व त्यांचा जिवन स्तर उंचावण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज असते. भारतातील अतिरिक्त असणाऱ्या लोकसंख्येमुळे घरांची समस्या ही एक स्वभाविक आहे. ही समस्या शहरांत जशी आहे तशीच ग्रामीण भागात सुध्दा आहे.

संयुक्त राष्ट्र संघानुसार 1987 या वर्षात बेघर असणाऱ्या कुटुंबांना घरे मिळवुन देण्याच्या हेतुने आतंराष्ट्रीय वर्षे म्हणुन घोषित केले आहे. त्यानुसार बेघर असणाऱ्या लोकांना घरे उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्टे ठरवले आहे. तरी देखील पुर्णपणे घरे उपलब्ध झालेली नाहीत. देशातील सद्यस्थितीचा विचार करता झपाटयाने वाढणारी लोकसंख्या, वाढती बेरोजगारी,महागाई,दारिद्रय, उत्पनातील असमान वितरण वाटप तसेच वाढते नागरीकरण , जागेची टंचाई अशा इत्यादी सर्व घटकांमुळे निवाऱ्याचा प्रश्न हा एक गंभीर समस्या म्हणुन बनला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या समस्यांच्या निवारणासाठी यावर उपाय म्हणुन ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या निवाऱ्याची समस्या सोडविण्याच्या माध्यमातुन प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली.

2) **पार्श्वभूमी** (History) :

मानवाच्या आर्थिक विकासाच्या इतिहासाचे अध्ययन केले असता आपणास असे लक्षात येते की, अर्थशास्त्रातील संकल्पनांचा उदय सभोवतालच्या परिस्थितीतूनच निर्माण होतो. आधुनिक काळातील अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन असे म्हणतात की, “आपण इतिहासात जगलो नाही पाहिजे ” पण इतिहास जाणून घेतल्याशिवाय आपण जगू शकत नाही. मानवाच्या मूलभूत गरजांपैकी निवारा ही एक मानवाची अन्न व वस्त्र यानंतरची महत्वाची गरज आहे. त्याच्या अनुषंगाने आपण प्रधानमंत्री आवास योजनेची पार्श्वभूमी समजून घेऊ.

भारतात सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यानंतर लगेचच निर्वासितांच्या पुनर्वसनेने झाली. 1960 पर्यंत उत्तर भाततातील विविध भागांमध्ये सुमारे 5 लाख कुटुंबांना घरे देण्यात आली होती. त्यांनंतर 1957 मध्ये पंतप्रधन नेहरुच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विलेज हाऊसिंग प्रोग्राम लागू करण्यात आली होती. ज्याव्दारे व्यक्ती आणि सहकारी संस्थांना प्रति युनिट 5000 पर्यंत कर्ज दिले जाते. या योजनेच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत केवळ 67 हजार घरे बांधण्यात आली. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात करण्यात आलेली दुसरी योजना हाऊस साईट्स कम बांधकाम सहाय्य योजना देखील राज्य क्षेत्राकडे हसतांतरित करण्यात आली होती.

1985 मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी इंदिरा आवास योजनाचा लॉन्च केल्यामुळे भारतातील सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रमाला चालना मिळाली होती. ग्रामीण आणि शहरी गरिबांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भारत सरकारच्या सतत प्रयत्नांचा एक भाग म्हणून प्रधानमंत्री आवास योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सुरु केली.

3) **प्रधानमंत्री आवास योजना** (PMAY) :

भारतातील नियोजन काळाचा विचार करता केंद्र सरकारने अलीकडील वर्षात शहरी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्या योजनांपैकी प्रधानमंत्री आवास योजना ही एक महत्वपूर्ण योजना म्हणून याकडे पाहिले जाते. प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) ही देशातील कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या जनतेस स्वस्त दरामध्ये वित्तीय सहाय्याद्वारे घर उपलब्ध करुन देणारी भारत सरकारची क्रेडिट लिंक सबसिडी योजना आहे.

या योजनेव्दारे 31 मार्च 2022 पर्यंत दोन कोटी परवडणारी घरे बांधण्याचे उद्दिष्टे ठेवण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने दोन असे घटक आहेत, त्या पैकी शहरी भागातील गरिबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना PMAY-U आणि ग्रामीण भागातील गरिबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना PMAY-G अशा दोन घटकांत आहे. इंदिरा आवास योजना 1985 ते 86 मध्ये ही योजना सुरु करण्यात आली होती. एप्रिल 1989 पासून तिची अंमलबजावणी जवाहर रोजगार योजनेचा एक भाग म्हणून करण्यात सुरु केली. नंतर भारत सरकारने तिला स्वतंत्र दर्जा दिला. याच योजनेची पुनर्रचना करुन प्रधानमंत्री आवास योजनास ही तयार करण्यात आली.

23 मार्च 2016 रोजी केंद्रीय कॅबिनेटने 2022 पर्यंत सर्वांसाठी घरी या अभियाना अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेला मान्यता दिली. या योजनेचया अंमलबजावणीची सुरुवात 2016 पासून करण्यात आली. त्यानुसार 20 नोवहेंबर हा दिवस दरवर्षी आवास म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधन नरेंद्र मोदी यांनी 2022 पर्यंत सर्वासाठी पक्की घरे यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेची घोषना केली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना 1.20 लाखा रुपये तर नक्षलग्रस्त व डोंगराळ दुर्गम भागातील लाभार्थ्यांना 1.30 लाख रुपये असे अनुदान घरकुल बांधण्यासाठी देण्यात आले. तसेच या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबांना देखील मूलभूत सुविधांसह पक्की घरे उपलब्ध करुन देण्याचे ठरवले आहे.

4) **संशोधनाचे अभ्यास क्षेत्राची निवड** (Selection Area Of Research Studay) :

1) नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात विशेष अभ्यास झालेला नाही, त्यामुळे हया विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

2) नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेतील नियोजित उद्दीष्टे ठरलेल्या कालखंडामध्ये पूर्ण झालेले नाही, त्यामुळे त्यामागील कारणांचा शोध घेणे हा संशोधनाचा मुख्य हेतु आहे.

3) नांदेड जिल्हा मराठवाडयाची उपराजधानी म्हणुन ओळखला जातो व तसेच नांदेड जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ 10528 km sq असे विस्तारीत स्वरुपाचे असल्यामुळे नांदेड जिल्हयाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

5) **विषयाचे महत्व** (Importance of research Topic) :

लोकसंख्येची झपाटयाने होणारी वाढ यामुळे घरांची कमतरता आणि वाईट राहणीमान हे भारत सरकार साठी एक प्रमुख आव्हान आहे. निवारा ही मानवाच्या मूलभूत गरजापैकी एक महत्वाची गरज आहे. तसेच लोसंख्या वाढ आणि वाढत्या नागरीककरणामुळे जागेची तसेच निवाऱ्याची गरज एक मोठे आव्हान म्हणून पाहिले जाते. प्रधानमंत्री आवास योजना : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) कालखंड 2017-2018 ते 2022-2023 या प्रस्तुत संशोधनात गरीब वस्तीतील जीवन जगणाऱ्या लोकांची जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने सुरु केलेल्या प्रधनमंत्री आवास योजनेचा अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून निवड करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हयातील सद्यस्थितीव्दारे ग्रामीण तसेच शहरी भागाचा म्हणावा तेवडा विकास झालेला नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे किमान पायाभुत सुविधावर लक्ष देणे फार महत्वाचे आहे. निवारा ही एक मुलभूत समस्या असल्यामुळे संशोधानात सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेचे खोलवर अध्ययन करण्याच्या दृष्टिकोनातुन या विषयाची निवड केली आहे. तसेच नमुना निवड तालुक्यातील लोकांच्या मूलभूत गरजांपैकी घराची एक समस्या आणि इतर सामाजिक व आर्थिक समस्या इत्यादींचे अध्ययन करुन, त्याची वास्तविकता अभ्यासणे, हा संशोधन विषय निवडतांना महत्वाचा हेतु विचारात घेतला आहे.

तसेच प्रस्तुत अभ्यासामध्ये नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेतील त्रुटी दुर करुण ही योजना अधिक प्रभाविपणे राबविण्याच्या दृष्टिने शासनाला मार्गदर्शन मिळेलं.

6) **संशोधनाची उद्दिष्टे** (Objectives of Research) :

1. प्रधानमंत्री आवास योजनेचा अभ्यास करणे.
2. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलाचे काम पूर्ण झाले आहे की नाही या संबंधी अभ्यास करणे.
3. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेचे तालुका निहाय अध्ययन करणे.
4. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत कार्याचा अभ्यास करणे तसेच या योजनेच्या विकासातील सरकारची भूमीका अभ्यासणे.
5. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीतील समस्यांचा अभ्यास करुन, त्यामध्ये शिफारशी सुचवणे.

7) **संशोधनाची गृहीतके** (Hypothesis of research) :

1. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानात लाभार्थ्यांच्या घरकुलांचे काही प्रमाणात काम पुर्ण होते.
2. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वित्तीय सहाय्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही.
3. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीतून कोणत्याही प्रकारची आंतर जिल्हा असमानता नसल्याचे दिसून येते.
4. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागामध्ये घरे उपलब्ध करुन देण्यामध्ये ही योजना यशस्वी ठरली आहे.

8) **संशोधन पध्दती** (Research Methodology) :

प्रधानमंत्री आवास योजना : एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2017-2018 ते 2022-2023) हा प्रस्तुत संशोधन विषय सामाजिक व आर्थिक असल्यामुळे, संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सामाजिक संशोधन पध्दती, सर्वेक्षणात्मक पध्दती व विश्लेषणात्मक पध्दतींचा अवलंब करण्यात येणार असून, तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितियक सामग्रीचा अवलंब करण्यात येणार आहे. नमुना निवडीसाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दत तसेच हेतुपुरस्सर नमुना निवड पध्दतीच्या साहाय्याने नमुना आणि तालुक्यांची निवड करणार आहोत. तसेच सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करुन प्राप्त माहिती व आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, वृद्धीदर, सहसंबंध याव्दारे देखली पडताळणी करण्यात येणार आहे.

8.1 **तथ्य संकलन** (Data collection) :

प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची, इत्यादी सांख्यिकीय साधनांचा उपयोग करुन, प्रस्तुत संशोधन समस्या संदर्भात माहिती संकलित करण्यात येणार आहे.

व्दितियक तथ्य संकलनासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आर्थिक सर्वेक्षण अहवाल, जिल्हा आर्थिक समालेचन यांचे विभिन्न वर्षाचे अहवाल, तहसील आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याव्दारे प्रकाशित करण्यात आलेली पुस्तिका आणि दस्तऐवज, त्याचबरोबर प्रस्तुत विषयावरील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके वृत्तपत्रे यामध्ये प्रकाशित झालेले शोध निबंध लेख, नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेले लेख, विविध मासिके, पाक्षिके, साप्ताहिक, दैनिक वर्तमानपत्रे, विभिन्न विभागातून तसेच भारत सरकार व महाराष्ट्र सरकार आणि नांदेड जिल्हा संकेतस्थळावर प्रस्तुत विषया संबंधित माहिती वापरण्यात येणार आहे.

8.2 **तथ्यांचे विश्लेषण** (Data analysis) :

उपरोक्त प्रमाणे प्राथमिक आणि दुय्यम तथ्य सामग्रीच्या आधारे संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्रे, शेकडेवारी,वर्तुळ,आलेख,स्तंभालेख, सरासरी, chi-square,t-test,ANOVA समाश्रयन रेषा इत्यादींच्या आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार आहे. याचबरोबर तक्ता व आलेख यासारख्या सांख्यिकीय तंत्रांचा अवलंब करण्यात येणार आहे तर संकलनासाठी यादृच्छिक नमुना पध्दतीच्या सहाय्याने नमुने घेण्यात येणार आहेत.

8.3 **संशोधनाचा कालावधी** (Time period of research) :

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी सन 2017-2018 ते 2022-2023 असा कालावधी घेण्यात येणार आहे.

8.4 **संशोधन विषयाच्या मर्यादा** (Limitations of research subject) :

1. प्रस्तुत संशोधनात प्रधानमंत्री आवास योजना एक चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषया अन्वये प्रधानमंत्री आवास योजनेचे अध्ययन हे नांदेड जिल्हयापुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधनात सन 2017-2018 ते 2022-2023 या कालखंडासंदर्भात अध्ययन केले जाणार आहे. म्हणून इतर कालावधीसाठी अध्ययनाचे निष्कर्ष लागू होतीलच असे नाही.
3. प्राथमिक आधारसामग्री संकलित करीत असताना मुलाखतीव्दारे अंदाजे माहिती सांगणे, पूर्वग्रह दुषित असणे,अशा काही मर्यादा पडू शकतात.

9) **प्रकरणांची रुपरेषा** (Chapter scheme) :

9.1) **प्रकरण पहिले : प्रस्तावना आणि संशोधन पध्दती**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषय निवड, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाचे गृहीतक, संशोधन पध्दती तसेच तथ्य संकलन तथ्याचे विश्लेषण अर्थपूर्णता आणि लक्षणे या पातळीचे निर्धारण संशोधना विषयाची व्याप्ती व मर्यादा या सर्व घटकांचे विश्लेषण करणार आहोत.

9.2 प्रकरण दुसरे: संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात सादरील संशोधन विषयाशी संबंधित विविध संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. हा आढावा घेत असतांना संशोधन साहित्याची तीन भागात वर्गीकरण केले आहे.

भाग एक : राष्ट्रीय पातभवरील संशोधन साहित्याचा आढावा.
भाग दोन : राज्य पातळीवरील संशोधन साहित्याचा आढावा.
भाग तीन : स्थानिक पातळीवरील संशोधन साहित्याचा आढावा.

9. 3) प्रकरण तिसरे : नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप

प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी नांदेड जिल्हयाचे भौगोलिक स्थान, दिशा, जिल्हयाचा नकाशा, जिल्हयाचा समग्र भौगालिक आढावा स्पष्ट करण्यात येणार आहे. तसेच नांदेड जिल्हयाची आर्थिक स्थिती वैशिष्टये निवडक सांख्यिकीय माहिती स्पष्ट केली जाणार आहे.

9.4) प्रकरण चौथे : प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात प्रधानमंत्री आवास योजने संबंधित अभ्यास करण्यात येणार आहे.

9.5) प्रकरण पाचवे : नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेतील संकलित तथ्याचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात संशोधक प्राथमिक आणि व्दितीयक आधार सामग्रीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करणार आहे.

9.6) प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारसी

प्रस्तुत प्रकरणात प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात केलेल्या तथ्य संकलनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष यांची मांडणी करण्यात येणार आहे. तसेच गृहीतकृत्यांची पडताळणी करुन संशोधनाच्या अनुषंगाने शिफारसी करण्यात येणार आहेत.

10)नियोजित आराखडा (Year wise plan of work):

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व आकलन याचबरोबर प्रबंध लेखनाचे काम यासाठी संशोधकाने संशोधनासाठी वर्षनिहाय नियोजित आराखडा हा एकूण तीन वर्षाकरिता तयार केला आहे. तो खालील प्रमाणे

प्रथम वर्ष :
सदरील वर्षात संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रथम प्रकरणांची रुपरेषा आणि मांडणी करणार आहे, याचबरोबर संशोधन साहित्याचा आढावा देखील घेणार आहे.

व्दितीय वर्ष :
सदरील वर्षात आधारसामग्री संकलित करुन, संकलित केलेल्या आधारसामग्रीचे विश्लेषण करण्याचे कार्य संशोधक करणार आहे.

तृतीय वर्ष :
तृतीय वर्षामध्ये संशोधक गृहीतकृत्यांची पडताळणी आणि निष्कर्ष व शिफारसी यांची मांडणी करणार असून संपूर्ण प्रकरणांची एकत्रित बांधणी करुन तयार प्रबंध विद्यापीठाला सादर करणार आहे.

11) अपेक्षित परिणाम (Expected outcomes) :

1. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीतून कोणत्याही प्रकारची आंतरजिल्हा असमानता नसल्याचे दिसून येते.

2. प्रधनमंत्री आवास योजनेचा नांदेड जिल्यातील सामाजिक विकासावर झालेला परिणाम लक्षात येतो.

3. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वित्तीय सहाय्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही.

4. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामगिरीतून असे लक्षात येते की, नांदेड जिल्हयातील तालुका निहाय व वर्षनिहाय लक्षणीय फरक दिसून येतो.

5. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना कायमस्वरुपी निवारा उपलब्ध झाला आहे .

6. नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागामध्ये घरे उपलब्ध करुन देण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे.

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography) :

संदर्भ (References):

1. बोधनकर सु. आणि आलोनि वि. आणि कुलकर्णी (1999) सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन नागपूर
2. डॉ. प्रदीप आगलावे (जून 2022) संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3. हरीश शुक्ला (2022) ग्राम समाज किंवा सेवा विकास प्रभात प्रकाशन.
4. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र शासन.
5. श्री रंजन कोळंबे (जानेवारी,2017) भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन.
6. भोसले आणि काटे. भरतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन पुणे.
7. C.R. Kothari (2004) New Age international (P)limited publishers, New Delhi.
8. योजना मासिक मार्च 2022.
9. लोकराज्य मासिक जानेवारी 2023.

संशोधन नियतकालिके (Research Journals) :

1. Nisar Khan (2019). Pradhan Mantri Awas Yojna An assessment from Housing Adequancy perspective.
2. Pinal Borot (june 2019). Pradhan Mantri Awas yojana (PMAY) Scheme-An emerging prospect of Affordable Housing in India.

अहवाल (Reports) :

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नांदेड जिल्हा विविध अंक 2017-2018 ते 2022-2023.

माहिती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार.

संकेतस्थळे (websites)

1. https://www.sarkariyojna.com.pmayg-2023
2. https://nanded.gov.in
3. https://hadesh.maharashtra.gov.in
4. https://nanded.gov.in/scheme/maha-yojna
5. https://mahadesh.maharashtra.gov.in
6. www.loksatta.com
7. www.indiatimes
8. http://www.indiatmes/

संशोधक

कु.कांचन माधव गिरी

एम.ए. (अर्थशास्त्र) बी.एड

मार्गदर्शक

डॉ.स्मिता उमाकांतराव कोंडेवार

सहा. प्राध्यापक आणि संशोधक मार्गदर्शक

कै. वसंतराव काळे वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड .